
# व्हिसल ब्लोअर धोरण

**(धोरण क्रमांक: 03.02.01 B/P-01/R1)**

| Rev. | जारीकरणाची तारीख | तया`र करण्यात आलेली पॉलिसी |
|---|---|---|
| 01 | 03.01.2022 |  |
| | | चीफ एथिक्स कौन्सेलरद्वारे (CEC) |

# व्हिसल ब्लोअर धोरण

## 1. पार्श्वभूमी

a. कंपनीतील घटकांनी, व्यावसायिकता, प्रामाणिकपणाn, एकात्मता व नीतीपूर्ण वर्तन यांच्या सर्वोच्च मानकांचा अवलंब करून, आपले आचरण न्याय्य व पारदर्शक राखावे, असे कंपनीला वाटते. हे साध्य करण्यासाठी कंपनीने टाटा कोड ऑफ कॉण्डक्ट (आचारसंहिता) (“कोड”) तसेच लाचलुचपतविरोधी आणि भ्रष्टाचारविरोधी (ABAC) धोरण स्वीकारले आहे. कंपनी व कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या कृतींचे प्रशासन करणारी तत्त्वे व मानके यात निश्चित करण्यात आली आहेत. या कोडचे प्रत्यक्ष किंवा संभाव्य उल्लंघन, मग ते कितीही क्षुल्लक स्वरूपाचे असले किंवा क्षुल्लक समजले जात असले, तरीही कंपनीसाठी गंभीर चिंतेचा विषय ठरेल. आचारसंहितेचे अशा प्रकारचे उल्लंघन लक्षात आणून देण्यामधील कर्मचाऱ्यांची भूमिका कमी लेखली जाऊ शकत नाही. कर्मचाऱ्यांना उल्लंघनाचे प्रकार कळवता यावेस याची तरतूद आचारसंहितेत आहे. ती पुढीलप्रमाणे:

**"25. चिंताजनक बाबींची माहिती देणे (रिपोर्टिंग)**

"टाटा कंपनीच्या व्यवसायावर किंवा प्रतिष्ठेवर परिणाम करू शकेल अशा प्रकारे, आचारसंहितेचे प्रत्यक्ष किंवा संभाव्य उल्लंघन होत असल्याची जाणीव टाटा कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला झाल्यास, त्याने/तिने तो त्वरेने व्यवस्थापनाला कळवले पाहिजे.”

b. यानुसार, टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडच्या (TPL), भारतातील किंवा परदेशातील सर्व आस्थापनांमध्ये, यामध्ये सर्व उपकंपन्या, सहयोगी आणि जॉइंट व्हेंचर्स तसेच TPLशी व्यवहार करणाऱ्या सर्व थर्ड पार्टीजचा समावेश होतो, काम करणाऱ्या व्यक्तींना कंपनीच्या अपेक्स एथिक्स कौन्सिलशी संपर्क करता यावा यासाठी यंत्रणा पुरवण्याच्या दृष्टीने व्हिसल ब्लोअर पॉलिसी (“पॉलिसी”) तयार करण्यात आली आहे.

सर्व स्तरांवर व श्रेणींमध्ये काम करणाऱ्या सर्व व्यक्तींना, यांमध्ये संचालक, वरिष्ठ व्यवस्थापक, अधिकारी व अन्य कर्मचारी (कायमस्वरूपी, निश्चित काळासाठी किंवा तात्पुरत्या नियुक्तीवरील), कन्सल्टण्ट्स, कंत्राटदार, प्रशिक्षणार्थी, इंटर्न्स, दुय्यम कर्मचारी, अस्थायी कर्मचारी आणि एजन्सी स्टाफ, एजंट्स किंवा आमच्या कंपनीशी निगडित अन्य कोणतीही व्यक्ती, यात चीफ एथिक्स कौन्सेलरद्वारे वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेल्या, आमच्या कंपनीच्या वतीने कृती करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो, (उपरोल्लेखित सर्वांचा उल्लेख यापुढे "कर्मचारी (एक किंवा अनेक)" असा केला जाईल); अशा सर्वांना हे धोरण लागू आहे.

थर्ड पार्टी (त्रयस्थ पक्ष) म्हणजे TPLशी व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती अथवा संस्था होय, यांमध्ये ग्राहक, पुरवठादार, कंत्राटदार, कन्सल्टण्ट्स, प्रतिनिधी, एजंट सल्लागार किंवा अज्ञात व्यक्तींचाही समावेश होतो.

## 2. व्याख्या

पॉलिसीमध्ये वापरल्या जाणाऱ्या काही महत्त्वपूर्ण संज्ञांच्या व्याख्या खाली दिल्या आहेत. येथे व्याख्या न केलेल्या कॅपिटल अक्षरांतील संज्ञांचा कोडखाली निश्चित अर्थ ग्राह्य धरला जाईल.

a. "लेखा समिती" (ऑडिट कमिटी) म्हणजे कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनी कायदा, 2013मधील 177व्या कलमानुसार स्थापन केलेली लेखा समिती होय.

b. चीफ एथिक्स ऑफिसर म्हणजे ऑडिट कमिटीने नियुक्त केलेला व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी

c. चीफ एथिक्स कौन्सेलर याचा अर्थ चीफ एथिक्स ऑफिसर/ऑडिट कमिटीचे अध्यक्ष यांनी नियुक्त केलेला अधिकारी/एग्झिक्युटिव होय.

d. "कोड" म्हणजे टाटा कोड ऑफ कॉण्डक्ट.

e. "अन्वेषक" म्हणजे चीफ एथिक्स कौन्सेलर/ अपेक्स एथिक्स कौन्सिल यांच्याद्वारे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या, सल्ला घेण्यात आलेल्या किंवा संपर्क साधण्यात आलेल्या व्यक्ती, यांमध्ये कंपनीचे ऑडिटर्स तसेच पोलिसांचाही समावेश होतो.

f. "प्रोटेक्टेड डिसक्लोजर (संरक्षित प्रकटीकरण)" याचा अर्थ अनैतिक किंवा अनुचित कृतीचा पुरावा देणारी माहिती उघड करण्यासाठी किंवा दाखवण्यासाठी, चांगल्या हेतूने केलेला कोणत्याही प्रकारचा संपर्क होय.

g. "सब्जेक्ट" म्हणजे, तपासाच्या प्रक्रियेदरम्यान, जिच्याविरोधात किंवा जिच्यासंदर्भात प्रोटेक्टेट डिसक्लोजकर करण्यात आले आहे अशी व्यक्ती.

h. "व्हिसल ब्लोअर (जागल्या)" म्हणजे या पॉलिसीखाली प्रोटेक्टेड डिसक्लोजर करणारा कर्मचारी किंवा थर्ड पार्टी होय.

i. "एजंट" म्हणजे कोणीही थर्ड पार्टी, मग तिचा कंपनीशी कोणत्याही स्वरूपाचा संपर्क असला तरी चालेल/कंपनीच्या वतीने कृती करणारी/ कंपनीच्या वतीने निर्णय करणारी व्यक्ती. एजंट्समध्ये विक्री एजंट, वितरक, कंत्राटदार, कन्सल्टण्ट्स, क्लीअरिंग आणि फॉरवर्डिंग एजंट्स यांचा समावेश होतो.

## 3. व्याप्ती

a. ही पॉलिसी टाटा कोड ऑफ कॉण्टक्ट आणि ABAC पॉलिसीचेच विस्तारित स्वरूप आहे. व्हिसल ब्लोअरची भूमिका खात्रीशीर माहिती कळवणाऱ्या पक्षाची आहे.  तपास करणे किंवा तथ्ये शोधणे त्याच्याकडून अपेक्षित नाही तसेच संबंधित प्रकरणात कोणती सुधारात्मक किंवा उपायात्मक कृती करणे आवश्यक आहे हे निश्चित करणेही त्याच्याकडून अपेक्षित नाही.

b. कोणतेही तपासकाम करण्यात व्हिसल ब्लोअर स्वत:हून भाग घेऊ शकत नाही, चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलने विनंती केल्याखेरीज तपासकामात भाग घेण्याचा अधिकार व्हिसल ब्लोअरला नाही.

c. प्रोटेक्टेड डिसक्लोजर, केसची गरज असेल त्याप्रमाणे, चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलद्वारे, योग्य पद्धतीने हाताळले जाईल.

## 4. पात्रता

या पॉलिसीखाली कंपनीचे सर्व कर्मचारी आणि थर्ड पार्टीज, प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स, करण्यासाठी पात्र आहेत. प्रोटेक्टेड डिसक्लोजर हे कंपनीशी किंवा अन्य कोणत्याही टाटा कंपनीशी निगडित असू शकते.

## 5. अपात्रता

a. अस्सल व्हिसल ब्लोअरला, कोणत्याही प्रकारच्या अयोग्य वर्तणुकीपासून, येथे नमूद केल्याप्रमाणे, संपूर्ण संरक्षण पुरवले जाईल. मात्र, या संरक्षणाचा कोणत्याही प्रकारे गैरवापर झाल्यास, व्हिसल ब्लोअरवर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल.
b. या पॉलिसाखाली संरक्षण याचा अर्थ व्हिसल ब्लोअरने जाणूनबुजून केलेल्या चुकीच्या किंवा बोगस किंवा दुष्ट हेतूने केलेल्या आरोपांमुळे त्याच्यावर झालेल्या शिस्तभंगाच्या कारवाईपासून संरक्षण असा होत नाही.
c. व्हिसल ब्लोअरने केलेली दोन किंवा त्याहून अधिक प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स दुष्ट हेतूने केलेली, खोडसाळपणाने केलेली, निराधार किंवा द्वेषपूर्ण किंवा चांगल्या हेतूने न केलेली आढळल्यास, त्याला त्यानंतर प्रोटेक्टेड डिसक्लोजर करण्यापासून, या पॉलिसीखाली, अपात्र ठरवले जाते. जो व्हिसल ब्लोअर जाणूनबुजून चुकीच्या तक्रारी किंवा आरोप करतो, तो शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल. ही कारवाई दंड, निलंबन आणि नोकरीवरून काढून टाकणे या स्वरूपाची असू शकेल.

## 6. प्रक्रिया

a. आर्थिक/लेखापालनाशी निगडित सर्व प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स, तपासासाठी, चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलकडे पाठवली गेली पाहिजेत.

b. अपेक्स एथिक्स कौन्सिल, ग्रेड बी कर्मचारी किंवा व्यवस्थापकीय संचालकांना थेट रिपोर्ट करणाऱ्या कर्मचाऱ्यांबद्दलची प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स, कंपनीच्या ऑडिट कमिटीच्या चेअरमनला उद्देशून करणे आवश्यक आहे आणि अन्य कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स कंपनीच्या चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलला उद्देशून केली पाहिजे.

c. कंपनीच्या चीफ एथिक्स कौन्सेलरच्या संपर्काचे तपशील कंपनीच्या इंट्रानेटवर तसेच कंपनीच्या वेबसाइटवर कायमस्वरूपी दिलेले असावेत आणि सर्व कर्मचाऱ्यांना कंपनीत रुजू होताना याची व्यवस्थित माहिती दिली पाहिजे.

d. ऑडिट कमिटीचे चेअरमन किंवा चीफ एथिक्स ऑफिसर किंवा चीफ एथिक्स कौन्सेलर वगळता, कंपनीच्या अन्य एग्झिक्युटिवला, प्रोटेक्टेड डिसक्लोजर प्राप्त झाले, तर त्याने/तिने ते चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्ल कौन्सिलकडे, योग्य कार्यवाहीसाठी, पाठवले पाहिजे. व्हिसल ब्लोअरची ओळख गुप्त राखण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

e. प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स शक्यतोवर लेखी दिली पाहिजेत, जेणेकरून, त्यात उपस्थित केलेला मुद्दा स्पष्टपणे समजून घेतला जाऊ शकेल. प्रोटेक्टेड डिसक्लोजर हे इंग्रजी, हिंदी किंवा व्हिसल ब्लोअर ज्या प्रदेशात काम करत आहे, त्या प्रादेशिक भाषेत, एकतर टाइप केले जावे किंवा वाचनीय हस्ताक्षरात लिहिले जावे.

f. आदर्श परिस्थितीत व्हिसल ब्लोअरने त्याची/तिची ओळख प्रोटेक्टेड डिसक्लोजरला जोडलेल्या पत्रात उघड करावी. चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलने हे पत्र काढून टाकावे आणि केवळ प्रोटेक्टेड डिसक्लोजर अन्वेषकांकडे तपासासाठी पाठवावे.

g. सामान्यपणे निनावी डिसक्लोजर्सची दखल घेतली जाणार नाही, कारण, प्रत्येक व्हिसल ब्लोअरशी प्रत्यक्ष बोलणे शक्य नाही. मात्र, जेव्हा निनावी व्हिसल ब्लोअर, कथित गुन्हेगार, स्थळ, घटनेचा प्रकार, या प्रकाराची माहिती असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांची नावे, विशिष्ट पुरावा, घोटाळ्यांतील रकमा अशी विशिष्ट आणि विश्वसनीय माहिती पुरवतो, तेव्हा चीफ एथिक्स कौन्सेलर त्याची/तिची विवेकबुद्धी वापरून, या पॉलिसीखाली, प्रोटेक्टेड डिसक्लोजर स्वीकारायचे की नाही याचा निर्णय करू शकतात.

h. प्ोटेक्टेड डिसक्लोजर्स तथ्यात्मक असले पाहिजे, ते संशय व्यक्त करणारे किंवा निष्कर्षासारखे असू नये. यामध्ये शक्य तेवढी विशिष्ट माहिती दिलेली असावी, जेणेकरून, चिंताजनक मुद्दयाचे स्वरूप व व्याप्ती यांचे व्यवस्थित मूल्यमापन करणे शक्य व्हावे आणि प्राथमिक अन्वेषण प्रक्रिया किती तातडीने सुरू करायला हवी याचा अंदाज यावा.

i. चिंतेचे मुद्दे खालील उल्लेख केलेल्यांपैकी सर्व किंवा कोणत्याही मार्गाने कळवले जाऊ शकतात.
   - ईमेल: tpl-whistleblower@tataprojects.com
   - खालील पत्त्यावर पत्र लिहावे:
     चीफ एथिक्स ऑफिसर/चीफ एथिक्स कौन्सेलर/चेअरमन ऑडिट कमिटी
     टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड
     वन बोलवार्ड रस्ता, लेक बोलवार्ड मार्ग, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई,
     मुंबई – 400076, भारत

## 7. तपास

a. या पॉलिसीखाली कळवण्यात आलेल्या सर्व प्रोटेक्टेड डिसक्लोजर्सची, कंपनीचे चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल, योग्य पद्धतीने, संपूर्ण तपासणी करतील.

b. अपेक्स एथिक्स कौन्सिलच्या सदस्यांबाबतच्या किंवा त्यांच्याशी संबंधित प्रोटेक्टेड डिसक्लोजर्सचा तपास खुद्द ऑडिट कमिटीद्वारे केला जाईल.

c. चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल, आपल्या विवेकबुद्धीने, तपासासाठी कोणत्या अन्वेषकांना सहभागी करून घ्यायचे याचा विचार करू शकतात.

d. चीफ एथिक्स ऑफिसर/चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल/ ऑडिट कमिटीचे चेअरमन यांनी घेतलेला तपासाचा निर्णय म्हणजे आरोप नव्हे, तर ही तथ्ये शोधण्याची त्रयस्थ पद्धत आहे. अनुचित किंवा अनैतिक कृती केली गेली आहे या व्हिसल ब्लोअरच्या निष्कर्षाला पुष्टी न देणारी निष्पत्तीही या तपासातून निघू शकते.

e. कायद्याच्या व अन्वेषणाच्या वैध आवश्यकतांचा अपवाद वगळता, सब्जेक्टची ओळख शक्यतोवर गुप्त ठेवली जाईल.

f. सब्जेक्टला तपासादरम्यान त्याच्या/तिच्याजवळची माहिती पुरवण्याची संधी दिली जाईल.

g. चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल किंवा अन्य कोणत्याही अन्वेषकाला, तपासादरम्यान, सहकार्य करणे हे सब्जेक्टचे कर्तव्य असेल. जोपर्यंत सब्जेक्टवर गुन्हा कबूल करण्याची सक्ती केली जात नाही, तोपर्यंत त्याने सहकार्य केले पाहिजे.

h. सब्जेक्टला, चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल आणि/किंवा ऑडिट कमिटीच्या सदस्यांव्यतिरिक्त, त्याने/तिने निवडलेल्या अन्य कोणाही व्यक्तीचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे. तपासाच्या कार्यवाहीदरम्यान कधीही स्वत:च्या खर्चाने कौन्सेल घेण्याचे स्वातंत्र्य सब्जेक्टला असेल.

i. तपासकामात हस्तक्षेप न करणे ही सब्जेक्टची जबाबदारी आहे. पुरावा राखून ठेवणे, नष्ट करणे किंवा त्यात फेरफार करणे यापैकी काहीही होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. सब्जेक्टने साक्षीदारांवर प्रभाव टाकणे, त्यांना पढवणे, धमक्या देणे, दहशत घालणे यापैकी काहीही करू नये.

j. तपास अहवालातील तथ्यात्मक संशोधनांवर प्रतिक्रिया देण्याची संधी सब्जेक्टला, अगदीच अपवादात्मक कारणे वगळता, दिली जाईल. आरोपाच्या समर्थनार्थ सज्जड पुरावा येत नाही तोपर्यंत सब्जेक्टवरील चुकीच्या कृत्यांचे आरोप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

k. प्रोटेक्टेड डिसक्लोजर प्राप्त झाल्यापासून 90 दिवसांच्या आत, सामान्यपणे, तपास पूर्ण केला जाईल.

## 8. प्रोटेक्शन (संरक्षण)

a. व्हिसल ब्लोअरने, या पॉलिसीखाली, प्रोटेक्टेड डिसक्लोजर दिले आहे या कारणास्तव त्याला/तिला कोणत्याही प्रकारे अन्यायकारक वर्तणूक दिली जाणार नाही. व्हिसल ब्लोअरच्या विरोधात भेदभाव,

छळ, पक्षपात किंवा नोकरीबाबत अन्य कोणत्याही प्रकारे अन्याय्य वर्तणूक करण्यास कंपनीचा एक धोरण म्हणून तीव्र विरोध आहे. सूड उगवणे, धमकी देणे किंवा सेवेतून बडतर्फी/निलंबनाची दहशत घातली जाणे, शिस्तभंगाची कारवाई, बदली केले जाणे, पदावनती, पदोन्नती नाकारली जाणे यांपासून व्हिसल ब्लोअरला संरक्षण पुरवले जाईल किंवा अधिकाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापर करून, पुढील प्रोटेक्टेड डिसक्लोजर करण्यासारख्या कर्तव्यपूर्तीत, व्हिसल ब्लोअरला अडथळा आणला जाऊ शकत नाही. प्रोटेक्टेड डिसक्लोजर केल्याचा परिणाम म्हणून व्हिसल ब्लोअरला अनुभवाव्या लागणाऱ्या अडचणी किमान स्तरावर ठेवण्यासाठी कंपनी पावले उचलेल. अशा रितीने, जर व्हिसल ब्लोअरला फौजदारी किंवा शिस्तभंगाच्या कारवाईत पुरावा देण्याची गरज भासणार असेल, तर कंपनी व्हिसल ब्लोअरला या प्रक्रियेविषयी सल्ला प्राप्त करण्याची सोयही करून देईल.

b. वरील कलमांचे उल्लंघन झाल्यास व्हिसल ब्लोअर चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिल यांना ते कळवू शकतो. ते याबाबत तपास करून योग्य ती कार्यवाही करतील किंवा तशी शिफारस करतील.

c. व्हिसल ब्लोअरची ओळख, शक्यतोवर तसेच कायद्याने परवानगी असेपर्यंत, गुप्त ठेवली जाईल. चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे व्हिसल ब्लोअरची ओळख उघड होऊ शकते याचा इशारा त्याला/तिला दिला जाईल (उदाहरणार्थ, अन्वेषकांद्वारे केल्या जाणाऱ्या तपासादरम्यान ओळख उघड होऊ शकते.)

d. कथित तपासात सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याला व्हिसल ब्लोअरला दिले जाईल तेवढेच संरक्षण दिले जाईल.

## 9. अन्वेषक

a. अन्वेषकांनी तथ्यशोधन आणि विश्लेषणाकडे जाणारी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्वेषकांना, या कालावधीत व त्यांच्या तपासाच्या कक्षेत कृती करण्याचे अधिकार व प्रवेशाचे हक्क चीफ एथिक्स कौन्सेलर/अपेक्स एथिक्स कौन्सिलकडून प्राप्त होतील.

b. तपासाचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असतील तशी तांत्रिक व अन्य संसाधने दिली जातील. सर्व अन्वेषक स्वतंत्र असतील तसेच तथ्ये व त्यांबद्दलच्या धारणा यांबाबत पूर्वग्रहमुक्त असतील. न्याय्य वर्तणूक, तथ्यात्मकता, सखोल तपास, नीतीमत्ता तसेच कायद्याच्या व व्यावसायिक मानकांची पूर्तता हे अन्वेषकांचे कर्तव्य असेल.

c. पुढील बाबी प्रस्थापित करणाऱ्या प्राथमिक परीक्षणानंतरच तपास सुरू केला जाईल:

   i. कथित कृत्यातून अनुचित किंवा अनैतिक क्रिया अथवा आचार घडणे आणि

   ii. तपास करता येईल एवढ्या माहितीची जोड आरोपाला असणे किंवा या विषयाचा पुढे जाऊन तपास करणे आवश्यक आहे असे चीफ एथिक्स ऑफिसर/चीफ एथिक्स कौन्सेलर यांना वाटणे.

## 10. निर्णय

अनुचित किंवा अनैतिक कृत्य घडले आहे असा निष्कर्ष तपासातून निघाला तर ऑडिट कमिटी चेअरमन/चीफ एथिक्स कौन्सेलर अपेक्स एथिक्स कौन्सिलकडे शिस्तभंगाच्या किंवा सुधारात्मक कारवाईची शिफारस करतील. पॉलिसीतील तरतुदींचे पालन करून झालेल्या तपासातील निष्कर्षांचा परिणाम म्हणून सब्जेक्टविरोधात सुरू करण्यात आलेली कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची अथवा सुधारात्मक कारवाई, कंपनी धोरणांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या तसेच लागू असलेल्या कर्मचारी किंवा स्टाफ आचारसंहितेतील अनुशासन प्रक्रियेला धरून असेल, हे स्पष्ट करण्यात आले आहे.

## 11. रिपोर्टिंग

अपेक्स एथिक्स कौन्सिलचे निमंत्रक प्रत्येक प्रकरणाची सद्यस्थिती (स्टेटस) काय आहे याची नोंद ठेवतील तसेच सद्यस्थिती, तपासाचे निष्कर्ष आणि केेलेली सुधारात्मक कारवाई यांचा नियमित अहवाल ऑडिट कमिटीला देतील.

## 12. दस्तावेज जतन करणे

सर्व लेखी स्वरूपातील किंवा दस्तावेजीकृत प्रोटेक्टेड डिसक्लोजर्स, तपासाच्या निष्कर्षासह, कंपनीद्वारे किमान सात वर्षांच्या काळासाठी, जतन करून ठेवले जातील.

## 13. सुधारणा (अमेंडमेंट)

पॉलिसीची अमलबजावणी, परीक्षण यांच्यावर अपेक्स एथिक्स कौन्सिलचे पर्यवेक्षण असेल आणि पॉलिसीत सुधारणाही कौन्सिलच घडवून आणते.